जिल्हा नोडल अधिकारी (कोरोना) तथा जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक कार्यालय

दुरध्वनी क्रं.०२५३-२५७२०३८ / २५७६३६८ E-mail -cs_nashik@rediffmail.com

कक्ष /कोरोना विषाणु/ 17150-55 /२०२० दिनांक:-१९ /०५/२०२०

वाचा:- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ चे कलम ३०,३३,३४,४१,व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं. कोरोना २०२० / प्र.क्र.५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं. प्र.क्र.५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

४. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचे आदेश क्रमांक कक्ष/कोरोना विषाणु/१०१/२०२० दिनांक ९/०३/२०२०

प्रति,

प्राचार्य

सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय व हॉस्पिटल

हिरावाडी नाशिक जि. नाशिक

विषय:- मालेगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ विषाणुच्या संशयित/ वाधित रुग्णांना सेवा देण्यासाठी आयुर्वेदीक महाविद्यालयाचे डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्यावावत

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यांत आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यांत साथरोग प्रतिवंधात्मक कायदा दिनांक १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २,३, व ४ मधील तरतुदीची अंमलवजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यावावतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे. आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

त्या अर्थी संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांनी उक्त पुर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलवजावणीसाठी Incident commander म्हणुन डॉ. सुरेश जगदाळे जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय नाशिक यांची नेमणुक केलेली आहे.

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते कि, मालेगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना (कोविड-१९) विषाणु संशयित वाधित रुग्णांची संख्या झपाटयाने वाढत असल्याने मालेगांव महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांना रुग्णसेवा देण्यासाठी CCC,DCHC व DCH रुग्णालयांची स्थापना करण्यांत आलेली आहे. सदर रुग्णालयांत रुग्णसेवा देण्यासाठी आपल्या आयुर्वेदीक महाविद्यालयातील डॉक्टर्स यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मालेगांव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील CCC,DCHC व DCH रुग्णालय येथे आपल्या आयुर्वेदीक महाविद्यालयाच्या प्रत्येकी ५ अधिव्याख्याता / वैद्य (डॉक्टर्स) यांना ७ दिवसांसाठी रोटेशन याप्रमाणे मा. आयुक्त महानगरपालिका मालेगांव यांच्या कार्यालयांस प्रतिनियुक्ती देण्यांत यावी. तसेच संवंधित डॉक्टर्स यांना आयुक्त महानगरपालिका

Scanned with CamScanner

मालेगांव यांचे कार्यालयांत हजर राहण्यावावत व त्यांचे आदेशान्वये रुग्णसेवा देण्याच्या सुचना देण्यांत याव्यांत. व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा नोडल अधिकारी (कोरोना) तथा जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक व सर्व संबंधितांना सादर करावा.

जिल्हा नोडल अधिकारी (कोरोना)
तथा
जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नाशिक
२) मा. आयुक्त, मालेगांव महानगरपालिका मालेगांव
३) मा. घटना व्यवस्थापक नाशिक जिल्हा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक
४) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक
५) मा. घटना व्यवस्थापक व प्रमुख समन्वयक मालेगांव तथा प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी कळवण

Scanned with CamScanner